# जिल्हा परिषद, हिंगोली

## सामान्य प्रशासन विभाग

Office 02456-221826
Fax 02456-221938
Email : ceozphng@gmail.com
ceozp.hingoli@maharashtra.gov.in


### प्रेस नोट

जिल्हा परिषद हिंगोलीच्या आस्थापने वरील गट-क संवर्गामधील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात क्र.०१/२०२३ दिनांक ०५/०८/२०२३ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिराती मधील दर्शविलेल्या आरोग्य सेवक पुरूष ४०% या रिक्त पदाच्या भरतीसाठी घेण्यात येणा-या ऑनलाईन परिक्षेचे वेळा पत्रक खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे. सदर ऑनलाईन परिक्षेचे परिक्षा केंद्र अमरावती व नागपुर या ठिकाणी खालील तक्यात दर्शविल्यानुसार निश्चीत करण्यात आली आहेत. संबधित उमेदवारांनी प्रवेशपत्रानुसार परिक्षेचे वेळापत्रक, पद व परिक्षा केंद्राचे ठिकाण इ.ची माहिंती घेवूनच परिक्षा केंद्रावर दर्शविलेल्या वेळेत उपस्थित रहावे

| अक्र | पदाचे नाव | ऑनलाईन परिक्षा दिनांक | परिक्षा केंद्र |
|---|---|---|---|
| ०१ | आरोग्य सेवक पुरूष ४०% | १०.०६.२०२४<br>११.०६.२०२४<br>१२.०६.२०२४ | ION DIGITAL ZONE **IDZ** CITYLAND M S VINSAR INFOTECH LANE C BESIDE SINDH HOSIERY CITYLAND TRADING HUB OFF NH6 NR.BORGAONDHARMALE **AMRAVATI** 444901 |
| | | | ION DIGITAL ZONE **IDZ** CITYLAND M S VINSAR INFOTECH LANE C BESIDE SINDH HOSIERY CITYLAND TRADING HUB OFF NH6 NR.BORGAONDHARMALE **AMRAVATI** 444901 |
| | | | ION DIGITAL ZONE IDZ 2 WADI MIDC BALAJI INFOTECH PLOT NO. D7/2 HINGNA MIDC OPP.OLD BAJAJPLASTIC LANE OPP.BMW SHOWROOM WADI HINGNA ROAD **NAGPUR** 440028 |
| | | | ION DIGITAL ZONE IDZ 2 WADI MIDC BALAJI INFOTECH PLOT NO. D7/2 HINGNA MIDC OPP.OLD BAJAJPLASTIC LANE OPP.BMW SHOWROOM WADI HINGNA ROAD **NAGPUR** 440028 |
| | | | ION DIGITAL ZONE **IDZ3** WADI TECHGRESSOR SOFT SOLUTIONS PVTLTD.G-4/1/B MIDC HINGNA WADI RD OPP MUNICH MOTORS BMW SHOWROOM **NAGPUR** 440028 |

प्रस्तुत पदाची ऑनलाईन परिक्षा ही हिंगोली जिल्ह्यामध्ये घेण्यात येणार नसुन उक्त नमुद केलेल्या इतर जिल्ह्यातील परिक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. याची नोंद संबधित उमेदवारांनी घ्यावी.

प्रस्तुत पदाच्या ऑनलाईन परीक्षेकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांना प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यासाठी ऑनलाईन लिंक जिल्हा परिषद हिंगोलीच्या zphingoli.in **या** संकेतस्थळावर देण्यात आली असुन उमेदवारांना सदर लिंकव्दारें प्रवेशपत्र डाउनलोड करुन घेता येतील. तसेच उमेदवारांच्या माहितीसाठी मराठी व इंग्रजी भाषेतील माहिती पुस्तीका zphingoli.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. उमेदवारांनी सदर संकेतस्थळावर जाऊन आपले प्रवेशपत्र डाउनलोड करून घ्यावेत. तसेच सदरील ऑनलाईन परिक्षेकरीता उमेदवारांनी त्यांचे प्रवेशपत्रामध्ये दर्शविलेल्या परिक्षेच्या रिपोर्टिंग वेळेच्या आधी अर्धा तास परिक्षा केंद्रावर उपस्थित राहावे.

उमेदवारांनी त्यांचे प्रवेशपत्रामध्ये दिलेल्या सुचनांचे सक्त पालन करणे आवश्यक आहे. जाहिरातीतील नमुद केलेल्या उर्वरित इतर पदाच्या ऑनलाईन परिक्षेचे वेळापत्रक नंतर कळविण्यात येईल.

उपरोक्त सर्व नमुद बाबीची सर्व सबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी असे मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवड समितीचे अध्यक्ष श्री.जितेंद्र पापळकर व जिल्हा परिषद हिंगोलीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अनुप शेंगुलवार यांनी आवाहन केले आहे.

07/6/2023

(अनंतकुमार कुंभार)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)
जिल्हा परिषद हिंगोली